# प्रामाणिक, नि:स्वार्थी भाव हीच आंदोलनांची ताकद

निस्वार्थी भावनेतून केलेला संघर्ष नेहमीच यशस्वी होतो. सत्याग्रहातली खरी ताकद शस्त्रात नसून त्यागात आहे. नेतृत्वाची खरी ओळख ही त्याच्या निस्वार्थी सेवेत आहे. प्रामाणिक निस्वार्थी भाव हीच सत्याग्रहाची ताकद असते. जगाला सत्याग्रहाची ताकद माहित आहे. भारताने स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही सत्याग्रहाची ताकद अनुभवली आहे. सत्याग्रहाचा हेतू प्रामाणिक असेल तर सत्याग्रहाची ताकद हाच प्रामाणिकपणा असतो. निस्वार्थी भावनेने काम करा यशाची वरमाला निशाणा बरोबर साधते. भारतात जेव्हा जेव्हा आंदोलने घडवून आली यातील यशस्वी आंदोलनांमध्ये महात्मा गांधीजीं आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सत्याग्रहाची ताकद प्रचंड मोठी होती.भारतातील यशस्वी आंदोलनांमध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्त्वात भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील काही यशस्वी आंदोलने म्हणजे १९१७ चा चंपारण्य सत्याग्रह,१९२०मधील असहकार चळवळ,१९३० चा मीठ सत्याग्रह किंवा दांडी यात्रा वर्ष १९४२ चे भारत छोडो आंदोलन होय. हे आंदोलन महात्मा गांधींनी दुसरे महायुद्ध चालू असताना ब्रिटीश राजवट संपवण्यासाठी मुंबईत सुरू केले होते. या आंदोलनाचा परिणाम म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याला गती दिली आणि अखेरीस १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. गांधीजींच्या अहिंसक आणि सत्याग्रहाच्या मार्गामुळे या आंदोलनांना मोठे यश मिळाले आणि शेवटी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यास महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील यशस्वी आंदोलनांमध्ये १९२७ मधील महाडचा चवदार तलाव सत्याग्रह अस्पृश्य समाजाला सार्वजनिक तलावाचे पाणी वापरण्याचा अधिकार मिळावा यासाठी झालेले यशस्वी आंदोलन आहे. या आंदोलनानंतरच तलाव दलितांसाठी खुला करण्यात आला. दुसरे आंदोलन वर्ष १९३० मध्ये नाशिकमधील काळाराम मंदिर सत्याग्रह आणि १९५६ मधील धर्मांतर आंदोलनाचा समावेश होतो. या आंदोलनांनी



अस्पृश्यता आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध लढा दिला, ज्यामुळे दलितांना मानवाधिकार आणि समानतेचे हक्क मिळण्यास मदत झाली. महाराष्ट्र आणि राज ठाकरे यांची आंदोलने त्यात २०११-१२ मध्ये राज ठाकरे यांनी पुकारलेले टोलविरोधी आंदोलन हे काही प्रमाणात यशस्वी झाले. या आंदोलनांमुळे काही टोलनाके बंद केले तसेच भोंग्यांच्या विरोधातले आंदोलन हेही काही प्रमाणात यशस्वी झाले. आंदोलनांच्या यशाची कारणे अर्थात जनतेचा पाठिंबा मोठ्या प्रमाणावर मिळाल्याने यशस्वी होतात. आंदोलन योग्य वेळी पुकारल्यास त्याचा अधिक प्रभाव पडतो.शांततापूर्ण आणि अहिंसक मार्गाचा वापर आंदोलनांच्या यशासाठी प्रेरणादायी व महत्वाचा ठरतो. वर्तमानात आंदोलनाची तीच ताकद श्री.मनोज जरांगे पाटील यांनी दाखवून दिली. मनोज जरांगे पाटील यांच्यासारखा अत्यंत साधेपणा, निस्वार्थी भाव असेल तर माणूस माणसाजवळ कसा जोडला जातो आणि आंदोलन काय आहे हे तमाम लोकशाहीला कळाले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींनी जगाला सत्याग्रहाचे शस्त्र दिले. त्यामध्ये निस्वार्थी भाव, संयम आणि अहिंसा ही मूलतत्त्वे होती. आजच्या काळात मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर लढा देताना मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनात हाच निस्वार्थी भाव दिसून येतो. जरांगे पाटलांचे आंदोलन हे वैयक्तिक स्वार्थापासून अलिप्त, व्यक्तिगत फायद्यासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या हक्कासाठी आहे. स्वतःच्या आयुष्याची पर्वा न करता त्यांनी उपोषणासारख्या कठोर मार्गाचा अवलंब केला. याच त्यागामुळे त्यांच्याप्रती जनतेच्या मनात विश्वास आणि आदरभाव निर्माण झाला. सत्याग्रहाचा आत्मा अहिंसा व शांतता आहे. सत्याग्रहाचे खरे सामर्थ्य म्हणजे हिंसेला प्रतिहिंसा न करता शांततेने लढा देणे. जरांगे पाटलांच्या आंदोलनाने अनेकदा हजारो लोकांना एकत्र आणले, परंतु कुठेही तोडफोड वा हिंसा दिसत नाही. यामुळे आंदोलनाला नैतिक बल प्राप्त होते. निस्वार्थी नेतृत्व लोकांच्या भावनांना हात घालते. लोकांना खात्री असते की नेते स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी झगडत आहेत. त्यामुळे हजारो तरुण, महिला आणि शेतकरी या आंदोलनात स्वयंप्रेरणेने सहभागी होतात. निस्वार्थी भावातून उभा राहिलेला सत्याग्रह केवळ सरकारला नव्हे तर संपूर्ण समाजाला विचार करायला लावतो. जरांगे पाटलांनी आरक्षणाच्या प्रश्नाला भावनिक, सामाजिक आणि नैतिक आधार दिला. त्यांच्या निस्वार्थी सत्याग्रहामुळे राजकीय पातळीवरही दडपण निर्माण झाले. जरांगे पाटलांचा संघर्ष हे केवळ एका समाजासाठीचे आंदोलन नाही, तर आधुनिक भारतात निस्वार्थी भावाचा सत्याग्रह अजूनही प्रभावी ठरतो याचा आदर्श आहे. मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन आपल्याला शिकवते की निस्वार्थी भावच सत्याग्रहाचे खरे सामर्थ्य आहे. स्वार्थविरहित नेतृत्वामुळे आंदोलनाला नैतिक उंची लाभते, लोकांचा विश्वास मिळतो आणि समाजपरिवर्तनाची वाट मोकळी होते. आंदोलनातील कोणताही आंदोलक उपाशी राहू नये, तहानलेला राहू नये म्हणून त्याची काळजी घेणारा समाज गावागावातून मुंबईकडे जाणाऱ्या पाण्याच्या आणि भाकरीचा अन्नपुरवठा हा एक समाजासाठी आदर्श आहे. इतिहासात सांगतो महात्मा गांधींनी जेव्हा ब्रिटिश सत्तेविरुद्ध सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला, तेव्हा त्यांच्या हाती शस्त्र नव्हते, सत्ता नव्हती, होते ते फक्त निस्वार्थी भाव, अहिंसा आणि सत्य याच शक्तीवर त्यांनी संपूर्ण ब्रिटीश साम्राज्याला गुडघे टेकवायला भाग पाडले. आज हाच आदर्श आपल्याला पुन्हा दिसतो मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनात. आंदोलन हे वैयक्तिक स्वार्थासाठी नाही. त्यांचा लढा हा एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाचा आहे. त्यांनी स्वतःच्या आरोग्याची, आयुष्याची पर्वा न करता उपोषणाचा कठोर मार्ग निवडला. कारण त्यांचा विश्वास आहे की "मी नव्हे, आपण!" हा निस्वार्थी भावच लोकांना एकत्र आणतो. जेव्हा जनता पाहते की नेता स्वतःसाठी काही मागत नसून समाजासाठी झगडतो आहे, तेव्हा हजारो लोक स्वतःहून त्याच्या मागे उभे राहतात. हाच खरा लोकशक्तीचा स्त्रोत आहे. या आंदोलनात हिंसा नाही, द्वेष नाही, सूड नाही. आहे ती फक्त शांतता, संयम आणि आत्मविश्वास. आणि म्हणूनच या आंदोलनाची ताकद सरकारला जाणवते, समाजाला विचार करायला भाग पाडते. श्री.मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाने दाखून दिले की, निस्वार्थी भावनेतून केलेला संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. सत्याग्रहातली खरी ताकद शस्त्रात नाही, तर त्यागात आहे.नेतृत्वाची खरी ओळख ही त्याच्या स्वार्थविरहित सेवेत आहे.



- डॉ. जयश्री पंढरीनाथ जाधव- कदम
सहाय्यक प्राध्यापक- अर्थशास्त्र
के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक

## अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये रक्तस्रावाच्या रुग्णांना जीवनदान



**नाशिक ।** अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पुन्हा एकदा तातडीच्या उपचारांमुळे रुग्णाचे प्राण वाचवण्यात यश आले आहे. 74 वर्षीय रुग्ण संपत दिवे आणि चाळीस वर्षीय मयूर केदारे यांना मोठ्या प्रमाणात रक्तस्राव व चक्कर येणे या तक्रारींमुळे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्वरित रक्त देऊन त्यांना स्टॅबिलाइज करण्यात आले व पुढील उपचारासाठी ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले.

यावेळी हॉस्पिटलच्या गॅस्ट्रोएन्टरॉलॉजी विभागाचे संचालक व पोटविकार तज्ञ डॉ. संदीप पाटील व त्यांच्या तज्ज्ञ टीमने डॉ. सारंग खडके आणि डॉ. अपूर्वा पोथरकर यांनी एंडोस्कोपी केली. तपासणीत रुग्णाला अत्यंत दुर्मिळ असलेल्या "हिमोसफ्कस पॅनक्रियाटिकस" या आजाराचे निदान झाले. या गुंतागुंतीच्या परिस्थितीत तात्काळ "कॉइलिंग" प्रक्रिया करून रक्तस्राव यशस्वीरित्या नियंत्रित करण्यात आला.

### प्रगत तंत्रज्ञानामुळे केसेसवर प्रभावी उपचार

या उपचारात इंटरवेंशन रेडिऑलॉजिस्ट डॉ. अमोल भालेकर यांचे महत्त्वाचे योगदान राहिले. उपचारानंतर रुग्ण दुसऱ्याच दिवशी स्टॅबिलाइज होऊन आयसीयू मधून वॉर्डमध्ये शिफ्ट करण्यात आला. डॉ. संदीप पाटील यांनी सांगितले की, हिमोसफ्कस पॅनक्रियाटिकस हा अत्यंत दुर्मिळ आजार आहे. ऑगस्ट महिन्यात अशा चार रुग्णांचे यशस्वी उपचार आमच्या गॅस्ट्रो टीमने केले आहेत. त्वरित निदान व प्रगत तंत्रज्ञानामुळे अशा गुंतागुंतीच्या केसेसवर प्रभावी उपचार करणे शक्य झाले आहे. या रुग्णासाठी ही अत्युच्च दर्जाची साधने उपलब्ध करून देण्यात अशोका मेडिकव्हरचे सेंटर हेड अनुप त्रिपाठी तसेच कोऑर्डिनेटर्स डॉ. सुजाता जयकर आणि डॉ. प्रवीण वानखेडे यांचा मोलाचा वाटा होता. अशोका हॉस्पिटलने नाशिक आणि आसपासच्या रुग्णांना विश्वासार्ह व उच्च दर्जाची आरोग्यसेवा पुरवली आहे. तसेच डॉ.अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आपले मनोगत व्यक्त केले की, आम्ही एकाच छताखाली रुग्णांना उत्तम व सर्वसमावेशक उपचार देण्यास कटिबद्ध आहोत. या प्रसंगी सूत्रसंचालन डॉ. हर्षदा तळेगावकर यांनी केले आणि कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मार्केटिंग हेड शिवकुमार रोहडे व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.


## ग्लोबंट इंडिया प्रा. लि. चा सीएसआर प्रकल्प कादवा कॉम्प्युटर एज्युकेशनमध्ये यशस्वी

**दिंडोरी ।** कादवा कॉम्प्युटर एज्युकेशन या एमकेसीएल मान्यताप्राप्त लर्निंग सेंटरमध्ये ग्लोबंट इंडिया प्रा.लि. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आय व



सॉफ्टवेअर सेवा कंपनीच्या सिएसआर प्रकल्पांतर्गत कौशल्यविकास उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या प्रकल्पाअंतर्गत एकूण ४५ विद्यार्थ्यांना नेटवर्क सपोर्ट कोर्सचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ तांत्रिक ज्ञानच आत्मसात केले नाही तर रोजगारक्षमतेसाठी आवश्यक असलेला आत्मविश्वास आणि व्यावहारिक अनुभवही मिळवला. विशेष म्हणजे, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वीपणे प्लेसमेंट झाली आहे.कादवा कॉम्प्युटर एज्युकेशनच्या मते, हा सिएसआर प्रकल्प त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी उज्वल भविष्यातील दारे उघडणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या उपक्रमासाठी त्यांनी ग्लोबंट इंडिया प्रा.लि.चे मनःपूर्वक आभार मानले असून सामाजिक उत्तरदायित्वातून राबविण्यात आलेल्या या प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे कौशल्य मिळाले आहे.

## लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर








**सिन्नर ।** आंतराष्ट्रीय स्तरावर सेवाभावी कार्य करणाऱ्या लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी २०२५ या वर्षाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षी या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. प्राथमिक व माध्यमिक विभागातून प्रत्येकी दोन तर महाविद्यालयीन विभागातून एक अशा पाच कार्यरत शिक्षकांना व एक सेवानिवृत्त शिक्षकाला जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती लायन्स क्लबचे अध्यक्ष बबन वाजे यांनी दिली.

जीवन गौरव पुरस्कारासाठी ना.शि.प्र. मंडळ संचलित चांडक कन्या विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक मधुकर भगत, तर उच्च माध्यमिक विभागातून सिन्नर महाविद्यालयातील एच.एस.सी. होकेशनचे गिरीश गुजराथी यांची निवड केली आहे. माध्यमिक विभागातून दापुर येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. सुदर्शन धस तसेच लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालय, सिन्नर येथील प्रिती पवार यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक विभागातून मनेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे अशोक पांगारकर आणि ठाणगाव येथील सोनाली सोनवणे यांना पुरस्कार दिला जाणार आहे. शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. आदर्श शिक्षक निवड समितीचे अध्यक्ष हेमंत वाजे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या निवड प्रक्रियेत विविध शैक्षणिक आणि सामाजिक निकषांचा विचार करण्यात आला.

यावेळी निवड प्रक्रियेचे सदस्य बबन वाजे, डॉ. विजय लोहारकर, मनिष गुजराथी, डॉ. गणेश पाटील, अपर्णा क्षत्रिय उपस्थित होते. पुरस्कार वितरण समारंभ गुरुवार (ता.११) रोजी सकाळी १०.०० वाजता सिन्नर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. या प्रसंगी पुरस्कारचे वितरण प्राचार्य डॉ. संजय सानप यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सचिव जयवंत काळे आणि खजिनदार प्रशांत शिंदे तसेच सर्व लायन्स सभासदांनी केले आहे.

**महत्त्वाचे**

## मुक्त विद्यापीठात तीन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती तथा राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा



करण्यात आला. यानिमित्ताने विद्यापीठात तीन दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून नाशिक ग्रामीण पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर आणि गंगापूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती एम. एम. नाईक उपस्थित होते. गंगापूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती एम. एम. नाईक यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्वांना प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी 'फिट इंडिया' (तंदुरुस्त भारत) ची शपथ दिली. दुसऱ्या दिवशी के.टी.एच.एम. महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका डॉ. मीनाक्षी गवळी यांचे 'दैनंदिन जीवनातील शारीरिक सुदृढता' या विषयावर व्याख्यान झाले. तिसऱ्या दिवशी 'संडे ऑन सायकल' आणि 'वॉकिंग फिटनेस' या विशेष उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. यात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, कुलसचिव श्री. दिलीप भरड यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यापीठातील सायकल संघानेही यात सक्रिय सहभाग घेऊन सायकलिंगचा संदेश दिला.

## सलाम! राजहंस पारखणाऱ्या शिक्षकाला...

**"आई-वडिलांप्रमाणेच आपल्याला घडविण्यात शिक्षकांचा महत्त्वाचा वाटा असतो. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार महत्त्वाचे ठरतात. शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठांतील शिक्षक हे केवळ ज्ञान देऊन विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करत नाहीत तर त्यांना आयुष्य कसे जगावे याबाबतही मोलाचे मार्गदर्शन करतात. म्हणूनच प्रत्येकाच्या मनात शिक्षकांविषयी आदर व प्रेम असते. प्रत्येकाच्या आयुष्यात एक तरी असा शिक्षक असतो, जो त्याच्या मनात कायमचे आदराचे स्थान मिळवतो. अशा विद्यार्थ्यांना शिक्षकांबाबत वाटणारी भावना...**



**आदरणीय गुरुजी, साष्टांग नमस्कार**

आज पाच सप्टेंबर. शिक्षक दिन. तमाम गुरुजनांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा पवित्र दिवस. म्हणूनच तुमच्याविषयी बोलण्याचा मोह मी आवरू शकत नाही. शिक्षक म्हणजे मूर्त ज्ञानपिपासा, शिक्षक म्हणजे अखंड ज्ञानाची तळमळ.शिक्षक म्हणजे ज्ञानामृत पाजून कसदार पिढ्या घडवणारा ज्ञानदूत. आपण विद्यार्थीपरायण होऊन जीवनभर या उक्तीला जागलात. ज्ञानाचे उपासक होऊन जगलात.अनुभवाचे गरुड म्हणून वावरलात. म्हणूनच माझ्यासारख्या हजारो शिष्यांचा माथा आपणासारख्या आदर्श गुरुपुढे झुकण्यासाठी कायम आतुर असतो.आज मनाचे फुलपाखरू शाळा महाविद्यालयीन वृक्षांच्या पारंब्यांवर पुन्हा पुन्हा झोका घेऊ पाहतेय. तुम्ही निर्माण केलेला ध्येयवाद आणि तडीस गेलेल्या त्या दिव्य स्वप्नांचा पारवा अजूनही मनात सारखा घुमतोय. गुरुजी,स्तुती म्हणून नव्हे तर आतले खोल दडलेले सांगावे म्हणून लिहितोय. तेव्हाच्या शाळेत भौतिक सोयी सुविधा पुरेशा नव्हत्याच. पण त्या गोष्टीचा बाऊ करता कामा नये, टाकाऊतून टिकाऊ घडवता येते म्हणून अडून बसता कामा नये, हा समायोजनाचा धडा तुम्ही आम्हाला शिकविलात. तुम्ही नेहमीच म्हणायचा की वर्गातला प्रत्येक तास, व्याख्यान एक सोहळा झाला पाहिजे. तुमच्या तासाला टवटवीत झालेले मुलांचे चेहरे आणि बोलणाऱ्या भिंती पाहून आम्हाला त्याचा प्रत्यय यायचा. तुमच्याकडे आमच्या प्रत्येकात दडलेला राजहंस पारखण्याची नजर होती. तुम्ही आमच्यातले हे टॅलेंट हेरून आम्हाला आमचे भविष्य घडविण्याच्या दृष्टीने संधी प्रकाशाची बेटे दाखविली. न्यूनगंडावर मात करण्यासाठी आणि माणूस म्हणून उभे राहण्यासाठी केवळ यशस्वीच नव्हे तर अयशस्वी माणसांच्या संघर्षकथाही सांगितल्यात. ग्रंथ वाचनाबरोबरच जीवनात रोज भेटणारी माणसे देखील वाचायला शिकवले. आमच्यातला भातृ-भगिनी भाव विकसित केला.नीतिमूल्यांचा आदर्श वस्तुपाठ घालून दिला. मधमाशी आणि आकाशाला गुरू मानायला शिकवले. आपल्या बुद्धीच्या कक्षेतील स्वप्ने पाहून त्या दिशेने मार्गस्थ व्हा अशी साद घातली. सामान्य बुद्धिमत्तेचाही विद्यार्थी आपल्या आवडीच्या क्षेत्रात सर्वोच्च पदावर पोहोचू शकतो हा आत्मविश्वास आमच्याच जागविला. आपल्या व्यासंगाच्या बळावर आम्ही आमच्या जीवन जाणिवांच्या कक्षा विस्तारित केल्या. आपण फक्त लढ न म्हणता डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना लाभलेल्या अय्यर सरांसारखे पुरोगामी विचारांचे धडे गिरवत जातीपातीच्या भिंती मोडून काढल्यात. गरजू, अनाथ शिष्यांसाठी प्रसंगी आपला खिसाही रिकामा केला. तुमच्या आदर्श विचारांना तुम्ही कृतीची व निर्धाराची जोड दिली. संगणक युगात ज्ञानाने आणि कृतीने तुम्ही एक चालता बोलता संगणक होता. संस्कारांची पेरणी करणारा एक कृषीवल होता. घर आणि शाळा हे दोन्ही संसार चालविताना झुकते माप तुम्ही शाळेलाच दिले. विद्यार्थी हेच दैवत आणि पुरस्कार तुम्ही मानला. संस्कृती, मूल्ये आणि समृद्ध ज्ञानविचारांचे बहरलेले झाड अशी प्रत्येक विद्यार्थ्यांची ओळख व्हावी हा तुमचा अट्टाहास अनाठायी कधीच नव्हता.जागतिकीकरणाच्या आजच्या काळात शिक्षण क्षेत्रातले बदललेले चित्र मी पाहतोय. संशोधनाची क्षितिजे विस्तारत आहेत. तुमच्यासारखे प्रज्ञावंत तो पैस अधिक व्यापक करीत आहेत.आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झालेले आहे. आंतरविद्याशाखीय शिक्षण व कौशल्य शिक्षणावर त्यात मोठा भर आहे. आमची मुले कॉन्व्हेंट मध्ये शिकतायेत अशा स्थितीत मराठी माध्यमांकडे दुर्लक्ष तर होत नाही ना असाही एक प्रश्न सतावतोय. क्रांतिकारी प्रसार माध्यमांनी मुलांना आपलेसे केले आहे. एकीकडे वरदान ठरणारी ही माध्यमे दुसरीकडे मुलांना कला,क्रीडा, वाचन आदींपासून दूर घेऊन चाललेली आहेत. ज्ञानार्थी ऐवजी परीक्षार्थी वाढवण्याकडे सर्वांचा कल दिसतोय. मेरिट हेच सर्वस्व हा विचार पोसला जातोय. त्यासाठी जीवघेणी स्पर्धा शिक्षण क्षेत्रातही सुरू आहे अशाही स्थितीत नामांकित संस्था प्रयोगशील दृष्टीने नव्या बदलांना सामोरे जात स्पर्धेत आपले अस्तित्व टिकवून आहेत. मात्र तुमच्या परंपरेचे पाईक विविध शाळाबाह्य सरकारी कामांमध्ये गुंतला आहे. हे सर्व करून तो अध्यापक आणि अध्यापनाचा धर्म कसोशीने पाळतो आहे. कारण तुमच्यासारख्या दीपस्तंभांचा आदर्श त्यांच्यापुढे आहे. तिच वाट चोखाळत हिवाळी सारख्या वाड्या वस्त्यांवरच्या प्राथमिक शाळा तिथल्या केशव गावित यांच्यासारख्या गुरुजनांमुळे आदर्शांचा नवा वस्तूपाठ घालत आहेत.नव्या आशादायी वाटा निर्माण करीत आहेत. या सर्वांच्या निष्ठा आणि सेवावृत्तीला मी सलाम करतो. तुम्ही जसे आम्हाला घडवले तसेच उद्याच्या ज्ञानसत्ता भारतासाठी नव्या पिढीचे उज्ज्वल भवितव्य त्यांच्या हातून घडो आणि सेवापरायणतेशी या दोघांचे नाते जडो हेच पसायदान मागतो.

तुमचा
आज्ञाधारक



- डॉ. दिलीप पुंडलिक पवार
प्राचार्य,कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,त्र्यंबकेश्वर,
9881451866

## महत्त्वाचे

### पार्कसाईड होममध्ये रंगली अनोखी 'काव्ययात्रा!'

**नाशिक ।** छत्रपती संभाजी नगर रोडवरील बळी मंदिरासमोर असलेल्या पार्कसाईड होम्स या भव्य गृहप्रकल्पात गणेशोत्सवानिमित्त अनोख्या 'काव्ययात्रा' या निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. रानकवी तुकाराम धांडे, राजेंद्र सोमवंशी, राजेंद्र उगले, प्रशांत केंदळे, प्रा.राजेश्वर शेळके, शुभांगी पाटील आणि रवींद्र मालुंजकर यांनी सहभाग घेतला. रानकवी तुकाराम धांडे यांनी 'आई होती तेव्हा, तुकोबा



आणि आजोबा' तसेच पाठ्यपुस्तकात प्रकाशित झालेली 'पोर डोंगरावं भाळली...' ह्या कविता गावरान शैलीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कवी आणि गीतकार राजेंद्र सोमवंशी यांनी विविध किस्से आणि 'मागणे तसे हे साधे, मज माणूस होता यावे...' ही कविता सादर करून मैफिलीत रंग भरला. कवी राजेंद्र उगले यांनी 'नाही गेलो पंढरीला; नाही गाईला अभंग, बापामध्येच शोधला; पंढरीचा पांडुरंग...' या कवितेने पित्याचे महत्त्व अधोरेखित केले. युवाकवी प्रशांत केंदळे यांनी 'जीवाचा जीव असते बायको, घराचा स्वर्ग करते बायको...' ही गझल सादर करून पत्नीप्रेमाची महती गायली. तर शुभांगी पाटील यांनी गोड गळ्याने सादर केलेल्या कवितांतून स्त्रियांविषयीची भावना जपली. प्रा.राजेश्वर शेळके यांनी 'शाळेमध्ये आले बघ बूट आणि टाय, मलाबी आनशीन का बाजारातून माय...' ही कविता सादर करत बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. कवी रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

### सरगम म्युझिक अकॅडमीतर्फे आज भक्तीगीतांची मैफल

**नाशिक ।** गणेशोस्तवानिमित्ताने सरगम म्युझिक अकॅडमीतर्फे आज शुक्रवारी (दि.५)' तुज मागतो मी आता ' या सुरेल भक्तीगीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. गंगापूर धबधब्याजवळ शंकराचार्य न्यास संचलित बालाजी मंदिरात दुपारी २ वाजता ही मैफल होईल. यावेळी गायक, संगीतकार नंदकुमार देशपांडे यांच्यासह त्यांचे ६० विद्यार्थी गणराया व बालाजीच्या चरणी स्वरसेवा अर्पण करणार आहेत. भाविकांनी व बालाजीभक्तांनी उपस्थित राहून भक्तिगीतांचा आनंद घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### नाशकात महाविद्यालयीन तरुणीचा विनयभंग

**नाशिक ।** महाविद्यालयात जात असतांना हात पकडून दुचाकीवर बसण्याचा आग्रह केल्याप्रकरणी मुंबई नाका पोलिसांनी एकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी तिच्या मैत्रीण आणि बहिणीसोबत महाविद्यालयात जात असतांना वाजिद जावेद शहा याने दुचाकी आडवी लावून हात पकडला. तसेच कोणीच पाहणार नाही म्हणत दुचाकीवर बसण्याचा आग्रह धरला. या प्रकरणी मुंबई नाका पोलिसांनी आरोपीविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

### उस्थळे येथे बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश

**पेठ ।** पेठ तालुक्यातील भुवन वनपरिक्षेत्रातील




उस्थळे वन परिमंडलात परिसरात गेल्या महीनाभरा पासून बिबट्याचा वावर असल्याचे उस्थळे व परिसरातील नागरिकांनी वनविभाग प्रादेशिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी योगेश साळवे यांचे कडे माहीती दिली होती. त्या अनुशंगाने वनविभागाचे सदरील परिसरात कॅमे-यांच्या सहाय्याने ट्रॅप लावून शहानिशा केली असता परिसरात बिबट्याचा अधिवास असल्याचे आढळून आले. त्यानंतर उस्थळे ग्रामपंचायत अंतर्गत सर्व ग्रामस्थ व शालेय विद्यार्थांस वन्यजीव रक्षकांडुन मानव व वन्यजीव संघर्ष आदींबाबत सविस्तर माहीती देत नागरिकांनी घ्यावयाची सुरक्षितता व काळजी बाबत जनजागृतीपर मार्गदर्शन केले होते. उस्थळे परिसरात लावलेल्या पिंज-यात एक महीन्या पासून अधिवास असलेल्या बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे.

### वीज महावितरणच्या गलथानपणामुळे शॉक लागून गायीचा मृत्यू

**नाशिक ।** म्हसरुळ दिंडोरी रोड येथील पोकार कॉलनी परिसरात डीपी त विद्युत प्रवाह उतरल्याने शॉक लागून गायीचा मृत्यू झाला. पोकार कॉलनी परिसरात विद्यूत तारांचे मोठे जाळे असून अनेक तारा उघड्यावर व अनेक डीपीचे झाकणे चोरीस गेले आहे तर अनेक डीपी मधील वायरिंग जुनी झाली आहे त्यामुळे वायरचे वरचे कव्हरच खराब झाले असल्याने येथे अनेक ठिकाणी पावसाळ्यात विद्युत प्रवाह उतरतो त्याच्या मुळेच आज एका मुक्या प्राण्याचा जीव गेलापोकार कॉलनीतील सर्व तारा भूमिगत कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.







# 'झाडे गायब, निधी गिळंकृत : 'माझी वसुंधरा'तील खेळ'

## ठेकेदाराविरुद्ध कारवाईची मागणी

**नाशिक ।** शासनाच्या 'माझी वसुंधरा' या महत्वाकांक्षी योजनेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ठेकेदारावर होत असून, यामुळे त्र्यंबक नगर परिषदेला जबरदस्त बदनामीला सामोरे जावे लागत आहे. नगरपरिषदेच्या वतीने मार्च २०२४ मध्ये मोठ्या गाजावाजा करत वृक्षारोपणाचे कार्यक्रम पार पडले. कागदोपत्री झाडे लावल्याचे दाखवले गेले असले तरी प्रत्यक्ष पाहणीमध्ये अनेक ठिकाणी झाडे लावलेली नसल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. श्रीराज इंटरप्राईजेस या ठेकेदाराकडून झाडे लावण्याची संपूर्ण जबाबदारी होती, मात्र त्यांनी केवळ कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून निधी गिळंकृत केल्याचा आरोप स्थानिक नागरिक व पर्यावरण प्रेमींकडून केला जात आहे. सिटी सर्व्हे नं. ६४८ चौकी माथा, बटरफ्लाय गार्डन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते गजानन महाराज मंदिर चौक रस्ता दुभाजक, स्वामी समर्थ मंदिर परिसर, नील पर्वत, कैलास राजा नगर सायकल ट्रॅक, ब्रह्मगिरी पायथा आदी भागात झाडे लावल्याचे नोंदीत दिसत असले तरी वास्तवात झाडांचा पत्ता नाही. लावलेली झाडे देखील नीट निगा न राखल्याने कोमेजून गेल्याचे दिसून येत आहे.

यात आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे झाडांच्या खरेदी किमतीतही मोठा घोटाळा झाल्याचा संशय आहे. बाजारभावापेक्षा उंच दर दाखवून ठेकेदाराने निधीचा अपहार केल्याचे बोलले जात आहे. शिवाय एका नामांकित बँकेकडून नगरपरिषदेला हजारो झाडे मोफत मिळाली होती. ही झाडे कुठे गायब झाली याबाबतही मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. या संपूर्ण प्रकरणी नागरिक, पर्यावरणप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांनी ठेकेदाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करून चौकशी समिति नेमण्याची मागणी केली आहे. तत्कालीन प्रांताधिकारी ओंकार पवार यांच्याकडे तक्रारी दाखल झाल्या असून, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुस्थिती उघड करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

या योजनेत निधी गेला, झाडे नाहीत त्यामुळे या परिस्थितीला ठेकेदार जबाबदार असल्याचे बोलले जाते. नगरपरिषदेने याबाबत सखोल चौकशी करून ठेकेदाराविरुद्ध कठोर पावले उचलली नाहीत तर प्रकरण चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नाशकात पावसाळ्यानंतर होणार कुंभमेळ्याची विकासकामे सुरू

## जिल्हाधिकाऱ्यांनी साधला तपोवनातील साधू-महंतांशी संवाद





**नाशिक ।** नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणारा कुंभमेळा साधू, महंत आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे कुंभमेळ्याशी संबंधित सर्व विकास कामे वेळेत पूर्ण होतील यासाठी प्रशासन नियोजन करीत असून, दीर्घ कालावधी लागणारी कामे पावसाळा संपताच सुरू करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले.

शर्मा यांच्यासह महापालिका आयुक्त मनीषा खत्री, कुंभमेळा विकास प्राधिकरणाच्या आयुक्त करिष्मा नायर, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे आदींनी पंचवटीतील पंचमुखी हनुमान मंदिर, श्री दिगंबर अनी आखाडा, श्री लक्ष्मी नारायण मंदिर, तपोवनातील कपिला संगम येथे भेट देत तेथील साधू, महंत यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, आगामी कुंभमेळ्यासाठी दोन वर्षांचा कालावधी राहिला आहे. या पार्श्वभूमीवर विविध विकास कामांना गती देण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्य शासनाने जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून क्षेत्रीय पातळीवर वरीष्ठ अधिकारी भेट देऊन कामांची पाहणी आणि साधू, महंत यांच्याशी संवाद साधत आहेत. आगामी कुंभमेळा स्वच्छ, पर्यावरणपूरक, सुरक्षित होईल, असे नियोजन करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. साधू, महंत यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. त्यामुळे साधू, महंत यांच्या अडचणी, समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील.

साधुग्रामसाठी भूसंपादन करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी तपोवन परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले. जिल्हाधिकारी शर्मा यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी साधुग्रामच्या जागेची साधू, महंत यांच्यासमवेत पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी कपिला संगम येथे भेट देत राम सृष्टीची पाहणी करून या ठिकाणी आरती केली. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरातून साधू, महंत येतील. त्यांच्यासाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तपोवन येथे कायमस्वरूपी पोलिस चौकी कार्यान्वित करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे, पोलिस उपायुक्त चंदक्रांत खांडवी, तहसीलदार अमोल निकम, राष्ट्रीय आखाडा परिषदेचे प्रवक्ते महंत डॉ. रामकिशोर शास्त्री, दिगंबर आखाड्याचे महंत भक्तीचरणदास महाराज, रामस्नेहीदास महाराज, महंत शंकरदास महाराज, माधवदास राठी आदी उपस्थित होते.

# संत कबीरनगरची जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचा प्रकार?

## शिंदे गटाकडून मनपा आयुक्तांकडे तक्रार



**नाशिक ।** नाशिक (प्र) शहरातील संत कबीर नगर झोपडपट्टी हटविण्याबाबत उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या आधारे दिलेल्या आदेशावर शिवसेना शिंदे गटाने प्रश्न चिन्ह उपस्थित केले असून, ही झोपडपट्टी न्यायालयाच्या आदेशान्वये हटवून ही जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप केला आहे.

या संदर्भात महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांने या संदर्भात जनहित याचिका दाखल केली होती. वरील याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांने स्वत:चा उल्लेख सामाजिक कार्यकर्ता असा केला होता.या याचिकाकर्त्याला समाजसेवक ही पदवी कोणी दिली ? याचा शोध घेऊन जर याचिकाकर्ता समाजसेवक नसेल व व्यावसायिक असेल तर तसा अहवाल महानगरपालिकेने उच्च न्यायालयाला देणे आवश्यक असून, न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेला सरकारी जमिनीचे सर्वेक्षण करायचे आहे. त्यानंतर तेथील बांधकामे कच्च्या की पक्या स्वरूपाची आहे याची नोंद अहवालात दयायची आहे. तसचे सरकारी जमिनी व्यतिरिक्त खाजगी जमिनीवर अतिक्रमण असेल तर त्याचे सर्वेक्षण करण्याचा आदेश नाही. न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ काढून मोक्याचा जागा बिल्डरला देण्याचा डाव असू शकतो अशी शंकाही घेतली आहे.

त्याची सत्यता पडताळून तसा अहवाल महानगरपालिकेने अहवाल द्यावा व कोणत्याही दबावाला बळी न पडता येथील रहिवाशांना न्याय द्यावा अशी विनंती केली आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, संपर्कप्रमुख विलास शिंदे, संतोष गायकवाड, नयना गांगुर्डे, विष्णूपंत बेंडकुळे, संजय खरात, पांडुरंग साळवे, अशोक साळवे, लक्ष्मण साळवे, प्रसाद घोडे, नाना कदम, यशवंत साळवे, सुभाष मुंढे, बाबासाहेब बांगर, राजु गव्हाने, मनोहर जाधव आदी उपस्थित होते.

# शिवभोजन थाळी मोजतेय अखेरच्या घटका

## केंद्रचालकांचे सरकारकडे थकले आठ कोटी ४० लाख रूपये

**नाशिक ।** महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुरू करण्यात आलेल्या शिवभोजन थाळी योजनेचे सहा महिन्यांपासून आठ कोटी ४० लाख रूपये थकले असून केंद्र चालकांपुढे योजना चालविण्याचे आव्हान आहे. त्यामुळे ही योजनाही गुंडाळण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. शहरी भागात ७५ तर तालुकास्तरावर ५० शिवभोजन केंद्रे आहेत.

शहरी भागात गरजूंना दररोज ९, १७५ तर तालुकास्तरावर ५, ८२५ थाळ्या पुरविल्या जातात. मागणीनूसार एका केंद्रावर दररोज ७५ ते २०० थाळ्या पुरविल्या जातात. शहरी भागात केंद्रचालकांना एका थाळीमागे ५० रूपये तर ग्रामीण भागात ३५ रूपये सरकारकडून दिले जातात. गरजू, गरीब, रोजंदारीवर काम करणारे कामगार, विद्यार्थी, वयोवृद्ध या घटकांसाठी उपयुक्त ठरलेली ही योजना अखेरच्या घटका मोजत आहे. मार्च महिन्यांपासून या केंद्राचालकांना पैसेच मिळाले नसल्याचे आढळून आले आहे.

शहरातील केंद्राचालकांचे १ ते १५ फेब्रुवारीपर्यंतचे तर ग्रामीण भागातील केंद्रांचालकांचे फेब्रुवारीअखेरपर्यंतचे पैसे देण्यात आले. त्यानंतर मात्र या केंद्र चालकांना दमडीही मिळालेली नाही. सहा महिन्याच्या काळात जवळपास आठ कोटी ४० लाख रूपये थकले आहेत.

### लाडकी बहीण योजनेचा परिणाम

महायुती सरकारसाठी गेम चेंजर ठरलेल्या लाडकी बहिण योजनेवर सरकारी तिजोरीतून मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. त्यामुळे इतर योजनांना कात्री लावून निधीची तजवीज केली जात आहे. दस्तुरखुद्द मंत्र्यांनीच ही बाब मान्य केली आहे. त्यामुळे अन्य योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

# योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा : पवार

**नाशिक ।** सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा,आगामी काळात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या १५० दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना जि.प. मुख्य कार्घकारी अधिकारी ओमकार पवार यांनी दिल्या.

पवार यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय सभा झाली. यावेळी बैठकीत प्रधानमंत्री आवास , रमाई आवास , शबरी आवास , भूमीहीन लाभार्थ्यांसाठी घरकूल , मोदी आवास घरकूल तसेच प्रधानमंत्री जनजाती अदिवासी न्याय अभियान या योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. लखपती दिदी उपक्रमाची अंमलबजावणी व प्रगती याबाबतही चर्चा झाली.पंधराव्या वित्त आयोगाच्या तरतुदीनुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर निधीचा वापर , ड्रीम व्हिलेज संकल्पना, ग्रामपंचायतींना पुरविण्यात आलेले साहित्य, गट विकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांची ग्रामपंचायत तपासणी, जनसुविधा व तीर्थक्षेत्र विकास कामांचा अहवाल तसेच पीएम विश्वकर्मा, गतिशक्ती योजना, आदर्श शाळा खोली बांधकाम, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा, पीएम श्री शाळांच्या निवडी व खर्च प्रगती यावर चर्चा करण्यात आली. महिला व बाल विकास विभागांतर्गत कुपोषण निर्मूलन व उपाययोजना, ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशन, तसेच वित्त विभागात पंचायत राज समिती व स्थानिक निधी लेखा कार्यालयाचे प्रलंबित परिच्छेद यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. बैठकीस डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, सामान्य प्रशासन विभागाचे दीपक पाटील, मारुती मुळे, इमारत व दळणवळण विभाग १चे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, डॉ. राजेंद्र बागुल यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उपस्थित होते.

# प्रारूप रचना जाहीर होताच 'प्रभागात' प्रचार

## इच्छुकांना सोशल मिडीयाचा मिळतोय आधार

**नाशिक ।** महापालिकेच्या निवडणूकीसाठी निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली असून, निवडणूक इच्छूकांनी आपापल्या प्रभागाची माहिती घेत सोशल माध्यमातून प्रचाराला सुरूवात केली आहे. त्यासाठी गणेशोत्सवानिमित्त गणेश मंडळांच्या आरतीसाठी हजेरी लावण्याचा धडाका इच्छुकानी सुरू केला आहे. विशेष म्हणजे जागा वाटप व राखीव जागा निश्चित होण्यास कालावधी बाकी असतांना स्वयंघोषीत उमेदवारांनी आपली उमेदवारी देखील जाहीर करून टाकल्याने इच्छूकांची संख्या पाहता निवडणूकीत आतापासूनच रंगत दिसू लागली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेच्या १२२ जागांसाठी २९ प्रभाग ४ सदस्यांचे तर २ प्रभाग ३ सदस्यांचे असणार असल्याची प्रभागाची प्रारूप रचना जाहीर केली आहे. शनिवारी महापालिकेच्या विभागीय कार्यालयांमध्ये तसेच ऑनलाईन या प्रारूप रचनेची प्रसिद्धी देण्यात आली असून, त्यावर येत्या ४ सप्टेंबरपर्यंत हरकती मागविल्या आहेत. या हरकती प्राप्त झाल्यानंतर ५ ते १२ सप्टेंबरपर्यंत हरकतींची सुनावणी होणार आहे. आगामी निवडणूकीचे भवितव्य ठरविणारी ही प्रभाग रचना सन २०१७ च्या निवडणूक प्रभाग रचने प्रमाणेच असून, नवीन वसाहती व भागाचा त्यात समावेश करण्यात आला असला तरी, या रचनेवर भाजपा, शिंदे गटाचा वरचष्मा असल्याची चर्चा केली जात आहे. गेल्या निवडणूकीत चार सदस्यांच्या प्रभागाची रचना भाजपला अनुकूल ठरली होती. त्यामुळे आताही भाजपाला ती फायदेशीर मानली जात आहे. असे असले तरी, प्रारूप जाहीर होताच इच्छूकांना घुमारे फुटले असून, आपल्या प्रभागात कोण कोणत्या भागांचा समावेश करण्यात आला याची माहिति सोशल माध्यमावर जाहीर करून 'सदैव आपल्या सेवेत' असल्याचे सांगत प्रचाराला सुरूवातही करण्यात आली आहे. जागा वाटपावर भवितव्य अवलंबून महापालिका निवडणूक महायुती, महाविकास





आघाडीकडून लढविली जाईल असे पक्षाचे वरिष्ठ नेते सांगत असले तरी, प्रत्यक्ष प्रभागात व स्थानिक पातळीवर मात्र युती, आघाडी विषयी अनिश्चितता व्यक्त केली जात आहे. सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाने स्वबळाची तयारी ठेवली आहे तर शिंदे गटही युती न झाल्यास स्वबळावर लढण्याची तयारी करीत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी अजित पवार गट काय करणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. आघाडीत देखील अशीच परिस्थिती असल्यामुळे जागा वाटपावरच इच्छूकांचे भवितव्य अवलंबून आहे. प्रभाग रचना भाजपाच्या पथ्थ्यावर सध्याची प्रभाग रचना २०१७ च्या निवडणूकीचीच असून, राजकीय दृष्ट्या विचार केल्यास त्यावेळी स्वबळावळ लढलेल्या भाजपच्या ती पथ्थ्यावर पडली होती. त्यामुळे आगामी निवडणूकीसाठी देखील ही रचना भाजपाच्या दृष्टीने फायद्याची असल्याची मानली जात आहे. अशा परिस्थितीत भाजपा आपल्या सोबत शिंदे गट, अजित पवार गटाला सोबत घेईल काय असा प्रश्न निर्माण होत आहे.

# लासलगाव पोलिसांची धडक कारवाई

## स्विफ्ट कारसह गांजा तस्करी उघड, २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विंचूर ।** लासलगाव पोलिसांनी गांजाच्या अवैध तस्करीवर धडक कारवाई करत दोन संशयितांना अटक केली असून तब्बल २,१०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर भरवस फाटा येथे सापळा रचण्यात आला.







दरम्यान, एमएच ०४ ईएन ८८११ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर गाडी एका दुचाकीला (एमएच १५ जीएच ५३४७) धडकून थांबली. तात्काळ पोलिसांनी कार अडवून तपासणी केली असता त्यामध्ये ९८५ ग्रॅम गांजा (किंमत ५,००० रुपये), दोन मोबाईल हँडसेट, रोख रक्कम यांसह स्विफ्ट कार असा एकूण २,१०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. या प्रकरणी संशयित सलीम कामूद्दीन पिंजारी व राजू हाजी अहमद पिंजारी (दोघेही रा. पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक) यांच्यावर भादंवि कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४), १३४, १७७ तसेच एन.डी.पी.एस. कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मुद्देमालामध्ये स्विफ्ट डिझायर कार, दोन मोबाईल हँडसेट, रोख रक्कम आणि ९८५ ग्रॅम गांजा यांचा समावेश असून त्याची एकूण किंमत २,१०,००० रुपये एवढी आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध गांजा तस्करीला मोठा आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ही कारवाई लासलगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील यांनी केली असून पोलिसांच्या दक्षतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांचा न्यायासाठी लढा

## १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करा : कॉ. राजू देसले

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत काम करणाऱ्या हजारो कंत्राटी आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी आपले न्याय हक्क सिद्ध करण्यासाठी १९ ऑगस्ट २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवा ठप्प झाली असून, डॉक्टर, नर्सेस, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, समन्वयक, सहाय्यक आदी कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. शासनाने १४ मार्च २०२४ रोजी घेतलेल्या शासन निर्णयानुसार १० वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, १८ महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही त्याची तातडीने अंमलबजावणी करा, अशी मागणी आयटक राज्य सचिव कॉ. राजू देसले, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते, आशा गट प्रवर्तक संघटना करीत आहोत व आंदोलनसा पाठिंबा देत आहोत. यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे ईमेल द्वारा मागणी केली आहे. आंदोलनकर्त्यांच्या मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे : १० वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे १००% समायोजन व दरवर्षी ३०% प्रमाणे सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास, नगरविकास




व वैद्यकीय शिक्षण विभागात समावेश. शासन निर्णय (दि.१४/०३/२०२४) लागू होईपर्यंत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करून नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व सुविधा द्याव्यात. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या पोलिस खटल्यांची तत्काळ मागे घेण्यात यावीत. राष्ट्रीय आयुष मिशन, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, HBT 'आपला दवाखाना', १५ वे वित्त आयोग, नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र व इंजिनीअर (विद्युत) आदी विभागातील कर्मचाऱ्यांचेही समायोजन करावे. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे ६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटी सेवा नियमित करावी. नागपूर, गोंदिया, जालना जिल्ह्यांतील 'सपोर्ट स्टाफ' समायोजन नियुक्ती आदेशांची अंमलबजावणी करावी. समकक्ष पद नसल्यास वित्त विभागाच्या १५ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार नवे पद निर्माण करून समायोजन करावे. उपकेंद्राच्या प्रस्तावित आकृतीबंधात कंत्राटी ऐवजी नियमित समुदाय आरोग्य अधिकारी पद निर्माण करावे. कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी (BAMS, BHMS, BUMS), तसेच RBSK वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समायोजन प्रादेशिक व जिल्हास्तरीय रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, कारागृह विभाग व इतर ठिकाणी शैक्षणिक अर्हतेनुसार करावे. शासनाने ८ मार्च २०२४ रोजी घेतलेल्या निर्णयानंतर १८ महिन्यांपासून कारवाई न झाल्याने असंतोष वाढला आहे. ८ व १० जुलै २०२५ रोजी झालेल्या चर्चांमधूनही तोडगा निघाला नाही. परिणामी, कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवा ठप्प झाल्यामुळे शासनाने तातडीने या न्याय्य मागण्यांचा विचार करून, १४ मार्च २०२४ रोजीचा शासन निर्णय त्वरित अंमलात आणावा, अशी कर्मचाऱ्यांची ठाम मागणी आहे. शासनाने मान्य करावी व आरोग्य विभागात कार्यरत गट प्रवर्तक ना कंत्राटी कर्मचारी दर्जा द्यावा त्यांना ही सुरुवातीला कंत्राटी नियुक्ती पत्र दिले होते. शासनाने दखल न घेतल्यास आयटक महाराष्ट्र वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# शिक्षकांसमोरील आव्हाने विद्यार्थी घडवण्यात महत्वाची भूमिका बजावतात : देशमुख




**देवळाली कॅम्प ।** शिक्षक समाज घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असले तरी, त्यांचा प्रवास अनेकदा मोठ्या आव्हानांनी भरलेला असतो. त्यांच्या समर्पण आणि कठोर परिश्रम असूनही, अनेक शिक्षकांना अशा अडथळ्यांचा सामना करावा लागतो, या आव्हानांचा परिणाम केवळ शिक्षकांवरच होत नाही तर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेवरही होत असल्याचे प्रतिपादन देवळाली कॅम्प शहर पोलीस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांनी केले.

येथील शिवयूवा प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त येथील देवळाली कॅन्टोन्मेंट हायस्कूल व प्रायमरी हायस्कूल मधील शिक्षकांचा सन्मान गौरव आयोजित करण्यांत आला होता .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महिला पोलिस उपनिरीक्षक मिताली कोळी, शिवयूवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड, पोलिस उपनिरीक्षक माया वायकर, पोलीस उपनिरीक्षक अशोक खांडे, मुख्याध्यापिका माधुरी कुलकर्णी, मुख्याध्यापिका राजश्री खैरनार आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिक्षकांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मोजाड यांनी करतांना संस्थेच्या कार्याची माहिती विषद केले यावेळी पर्यवेक्षक प्रमोद वैद्य, माधव कुटे, रामचंद्र गवळी, जयमाला पाटोळे, सुर्वणा गिते आदीं शिक्षकांसह शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन पोपट खंडीझोड यांनी तर आभार पंकज निसाळ यांनी मानले.

## नाशिक गणेश दर्शन...


सुमन सोनवणे व मैत्रिणी



शितल गुंजाळ


उर्मिला जाधव


अंकिता सोनवणे, प्रियंका सोनवणे


वैशाली बिरारी, कंधाणे


उज्ज्वला इप्पर


??


ज्योती शेळके


ममता चौधरी


ज्योती मनोहर


त्रिशा देवरे


पूनम वाघ


प्रभावती काटे, सटाणा


शिवाली दशरथ गागोडे, कसबे वणी


करुणा पाटील, साक्री


कल्याणी धोंगडे, नामपूर


खेडकर परिवार त्रिमुर्ती चौक नवीन नाशिक यांनी पुठ्ठा व कागद यापासून साकारलेला जेजुरीगड देखावा...


कोमल मोरे

